
लोकमत
# लोकमंच



हॅलो सातारा, बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०१४ पान ४ ई-मेल- kolokmanch@gmail.com / फॅक्स - ०२३०-२४६९५०६



# आणि मारुती सापडला...



संध्याकाळी शाळेतून परत आलो होतो. घरी आल्यावर थोडे फ्रेश होऊन लगेच इंटरनेट सुरु केले होते. दिवाळीच्या सहलीचे बुकिंग करण्याची जोरदार तयारी सुरु होती.

वेगवेगळ्या साईटवरुन माहिती घेणे चालू होते. मध्येच फेसबुकवरती आमच्या सहलीची मार्गदर्शक असलेली माझी मैत्रीण नादियाबरोबर चर्चा सुरु होती. तेवढ्यात आमच्या शेजारच्या ताई एक Pen drive घेऊन आल्या. त्या सांगत होत्या, त्यांचे पती फलटणवरुन कोल्हापूरला जाताना मध्ये एका गृहस्थाला लिफ्ट दिली. तो पुढे कोल्हापूरमध्ये उतरला; पण उतरताना तो आपली बॅग मात्र गाडीतच विसरुन गेला. त्याचा शोध घेण्याचा नंतर प्रयत्न केला; पण तो काही सापडला नाही. त्याच्या बॅगमध्ये भली मोठी अभ्यासाची पुस्तके आणि एक Pen drive होता. त्या पुस्तकांमध्ये कुठे त्याचे नाव नव्हते. फक्त तो विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहे आणि काही तरी संशोधनपर अभ्यास करतोय, एवढाच बोध होत होता. मी तो Pen drive मशीनला जोडला. त्या Pen drive ला नाव होते मारुती आणि त्यामध्ये होते फक्त त्या व्यक्तीचे फोटो.

पहिले नाव आणि फोटोवरुन माणूस कसा सापडणार, हा विचार सुरु होता. मध्येच कल्पना सुचली की, हा फोटो आपण फेसबुकवरती टाकून बघूया. सुरुवातीला नादियाशी फेसबुकवरतीच चर्चा सुरु झाली. काय करावे फोटो टाकावा का? तसे कोणी सापडेल का? नेहमीप्रमाणे तिने आशादायी उत्तर दिले आणि टाक म्हणून सांगितले. मग लगेच एक छोटेखानी बातमी तयार केली.

बातमी काहीशी अशी होती :

आपण यांना ओळखता का?

आमचे शेजारी कोल्हापूरला जाताना त्यांनी एका व्यक्तीला स्वतःच्या गाडीत जागा दिली. ती व्यक्ती कोल्हापूरमध्ये उतरली; पण त्याची बॅग आमच्या शेजाऱ्यांच्या गाडीत राहिली. बॅगमध्ये व्यक्तीबद्दल काही माहिती मिळत नाही; पण फक्त एक Pen drive आहे. ज्यामध्ये त्याचा फोटो आहे आणि त्याचे नाव मारुती आहे, असे समजते. कुणाला खालील फोटोमधील व्यक्ती माहीत असेल, तर संपर्क करावा.

सोबत मारुतीचा फोटो होता. बातमी फेसबुकवरच्या माझ्या टाईमलाईनवरती झळकू लागली. मध्येच पुन्हा मी माझ्या सहलीच्या बुकिंगच्या कामात गुंतलो. जवळजवळ एका तासाच्या आत माझ्या एका कऱ्हाडच्या मैत्रिणीचा मेसेज आला की, हा मारुती तिचा फेसबुक फ्रेंड आहे आणि तो तिच्या फ्रेंडलिस्टमध्ये आहे. एवढ्या लवकर मारुती सापडला? मी देखील अवाक् झालो. तिची फ्रेंडलिस्ट पाहिली तर काय तिथे Pen drive मधील सर्व फोटो असलेला मारुती धनावडे. Research Student At dept. of Microbiology SUK at Research Assistant नावाचा गृहस्थ सापडला. मी लागलीच Friend Request टाकून दिली आणि त्याला मेसेज देखील केला. दोन दिवसांत मारुतीकडून काहीच उत्तर आले नाही. तिसऱ्या दिवशी दुपारी मारुतीने उत्तर दिले. त्याचा फोन नंबर दिला आणि आमचे प्रत्यक्ष बोलणे देखील झाले. मारुती भारावून गेला होता, कारण त्याच्या बॅगमध्ये त्याचे गेल्या काही वर्षांचे काम होते आणि ते त्याच्यासाठी खूप महत्त्वाचे होते. बरोबर १५ दिवसांनी मारुतीने त्याच्या एका मित्राकरवी आपली बॅग नेली. मारुती आता माझ्या फ्रेंडलिस्टमध्ये आहे. अधूनमधून बोलणे सुरू असते. आमच्या सहलींचे कौतुक करीत असतो आणि आपल्या मित्रांना देखील सांगत असतो. आजच्या झपाट्याने वाढता चाललेल्या तंत्रज्ञानात काय होऊ शकते, याची ही आगळीवेगळी अनुभूती होती. खरे तर तंत्रज्ञान हे पाण्यासारखे आहे. आपण त्यात काय मिसळायचे हे आपण ठरवायचे आहे. याच तंत्रज्ञानाच्या मदतीने मारुतीला त्याची बॅग सापडली होती आणि आम्हाला मारुती...

प्रकाश अनभुले,
फलटण, जि. सातारा